ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

## प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2018–2019**

## *अनुक्रमणिका*

१. विद्याशाखेचा परिचय ........ ४

२. बालसंगोपन आणि रंजन शिक्षण (C31) : शिक्षणक्रमाविषयी ........ ४

३. स्वयं-साहाय्य गट प्रेरक/प्रेरिका (C32) : शिक्षणक्रमाविषयी ........ १२

४. शालेय व्यवहारांकरिता माहिती-संप्रेषण तंत्रविज्ञान (C35) : शिक्षणक्रमाविषयी ........ १७

५. आशययुक्त अध्यापन पद्धती (C36) : शिक्षणक्रमाविषयी ........ २०

६. मूल्य शिक्षणाची मूलतत्त्वे मूलभूत (E32) : शिक्षणक्रमाविषयी ........ २६

७. घरकामगार कौशल्य (E36) प्रमाणपत्र : शिक्षणक्रमाविषयी ........ २८

## निर्मिती

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०१८, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ प्रथम प्रकाशन : जुलै २०१८

■ अक्षरजुळणी : मे. ॲकोसिस, नाशिक

■ प्रकाशक : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB_18_19_02 (Education_Cert.)**

## १. विद्याशाखेचा परिचय

या विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात शिक्षणशास्त्र विद्याशाखेची स्थापना झाली. त्यानंतर शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपले नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. आज संपूर्ण महाराष्ट्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे नेतृत्वाच्या दृष्टीने पाहतो. अद्ययावतता, गतिमानता आणि नवोपक्रमांचे स्वागत ही या विद्याशाखेची वैशिष्ट्ये.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपल्या कार्यास सुनिश्चितरित्या आणि गुणवत्ता राहावी या दृष्टीने विद्याशाखेचे गुणवत्ता धोरण, व्रतविधान आणि उद्दिष्टे निश्चित केली. त्या अनुषंगाने विद्याशाखेत प्रमाणपत्रापासून संशोधनापर्यंत अनेक शिक्षणक्रम टप्प्या–टप्प्याने सुरू झाले. विद्याशाखेच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात (१९९१) दूरशिक्षणाद्वारे बी. एड. शिक्षणक्रम सुरू करणारे संपूर्ण भारतातील हे पहिले मुक्त विद्यापीठ होय. त्यानंतर ह्या विद्याशाखेने अवघ्या दहा–पंधरा वर्षांत एम. फिल. शिक्षणशास्त्र (२००७), एम. फिल. शारीरिक शिक्षण (२००७), एम. एड. (१९९४), एम. ए. शिक्षणशास्त्र (२००७), बी.ए. (ई–एज्युकेशन : २००९) असे उच्च पदवी शिक्षणक्रम सुरू केले. एवढेच नव्हे तर विद्यापीठाच्या ध्येयास सुसंगत असे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणारे स्वयं–साहाय्य गट बांधणी (२००२), बालसेविका (२००२), मूल्य शिक्षण, आशययुक्त अध्यापन पद्धती, चर्मकला कौशल्य विकसन यांसारखे प्रमाणपत्र शिक्षणक्रमही कार्यान्वित केले. शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी मुख्याध्यापकांसाठी शालेय व्यवस्थापन पदविका तर माध्यमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन केले. 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहचवण्याच्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात अभ्यासकेंद्रे स्थापन केली.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची असते, तर ह्या विद्याशाखेत प्रवेश घेणारे विद्यार्थी सेवांतर्गत असतात. ह्याचा विचार करून शिक्षणक्रमांची व त्यातील प्रात्यक्षिकांची रचना केली. प्रत्येक प्राप्त अनुभव वास्तविक स्तरावर पडताळून पाहता यावा यासाठी विशेष प्रात्यक्षिकांचे नियोजन केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व तज्ज्ञांच्या मदतीने मुद्रित–अमुद्रित साहित्य तयार केले. ह्या विद्याशाखेतील शिक्षणक्रम व्यावसायिक असतात. त्याचा विचार करता अभ्यासकेंद्रांवर शिक्षणक्रमातील विशिष्ट प्रात्यक्षिके मार्गदर्शनाखालीच करता यावी, त्याचा सराव व्हावा या दृष्टीने संपर्कसत्रांचे आयोजन केले.

मुक्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखा अनेकविध पुरस्कारांनी विभूषित आहे हे सांगण्यास आम्हाला आनंद होतो. आंतरराष्ट्रीय पुरस्कारात डॉ. अनंत जोशी, माजी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना COL कडून मिळालेला जीवनगौरव पुरस्कार, श्रीमती वानखेडे स्वाती, बी. एड., एम. एड. ची विद्यार्थिनी ह्यांना COL कडून मिळालेला Award of Excellence for D.E. ह्यांचा समावेश होतो. तसेच येथील प्राध्यापक वर्गासही राष्ट्रीय व राज्य पातळीवरील वैयक्तिक पुरस्कार मिळालेले आहेत.

## २. बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C31) : (Early Childhood Care & Education)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात बालसेविका प्रमाणपत्र शिक्षणक्रम २००२ मध्ये सुरू करण्यात आला. केंद्र शासनाने ९३ वी घटनादुरुस्ती करताना फक्त ६ ते १४ वर्षे वयोगटाच्या मुला–मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली आहे. तथापि, अडीच ते साडेपाच वर्षे वयोगटाच्या बालकांच्या विकासाबाबत केंद्र शासन व राज्यशासन कोणत्याही प्रकारची निश्चित अशी जबाबदारी स्वीकारण्यास तयार नाही. त्यामुळे संपूर्ण देशात व महाराष्ट्र राज्यात देखील एकंदरीतच बालविकासाची अत्यंत हेळसांड होत आहे. बालशिक्षण क्षेत्रात जरी विविध प्रकारच्या संस्था विविध प्रकारे कार्यरत असल्या तरी त्यांच्या कार्यात एकवाक्यता व एकसूत्रता आढळून येत नाही अशी वस्तुस्थिती आहे. या परिस्थितीचा विचार करून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या संयुक्त विद्यमाने बालशिक्षण क्षेत्रात एकसूत्रता निर्माण व्हावी या उदात्त हेतूने प्रस्तुत बालसेविका प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू केलेला आहे. त्यामुळे या शिक्षणक्रमात सहभागी होणाऱ्या, सेवेत असलेल्या व सेवेत नसलेल्या अशा सर्वांनाच बालविकासाचे शास्त्रीय ज्ञान व कौशल्य प्राप्त होण्याची संधी मुक्त विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेली आहे. आतापर्यंत या विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांसाठी अनेक विद्यार्थ्यांनी नावे नोंदविलेली आहेत. आपणदेखील आज त्यात सहभागी होत आहात ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. बालशिक्षण क्षेत्रात, बालविकासाच्या शास्त्रशुद्ध ज्ञानाची व कौशल्याची गरज लक्षात घेऊन या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या असंख्य बालसेविकांच्या प्रशिक्षणासाठी मुक्त विद्यापीठाने ही सुविधा महाराष्ट्रात प्रथमच उपलब्ध करून दिलेली आहे. प्रस्तुत शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर आपल्या कार्याचे आपणांस शास्त्रीय ज्ञान मिळून त्यामुळे निश्चितच बालविकासासाठी उपयोग करण्याचे कौशल्य प्राप्त होईल असा विश्वास मुक्त विद्यापीठास वाटतो. २००९ पासून ह्या शिक्षणक्रमाचे नामांतर बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम असे केलेले आहे. ह्या शिक्षणक्रमास आपण प्रवेश घ्यावा व शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करावा यासाठी आपणांस हार्दिक शुभेच्छा !

### शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

महाराष्ट्रात विविध शासकीय व अशासकीय संस्था बालशिक्षणाच्या क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत आहेत. मात्र या शिक्षणक्रमास शिकविणारे प्रशिक्षित

कार्यकर्ते पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाहीत. अनेक खेड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेतलेल्या किंवा अल्प कालावधीचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण करणाऱ्या व्यक्ती बालवाड्या चालवताना दिसतात. कोणतीही डी.एड. शिक्षिका कायमस्वरूपी 'बालवाडी शिक्षिका' म्हणून ग्रामीण भागात काम करण्यास फारशी उत्सुक नसते. तसेच काही ठिकाणी बालशिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या एखाद्या मध्यवर्ती संस्थेच्या पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली इयत्ता आठवी ते इयत्ता दहावी पास मुली खेड्यांमध्ये बालशिक्षणाचे कार्य करतात. भारत सरकारच्या एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत निरनिराळ्या तालुक्यांतून अंगणवाड्या तसेच बालवाड्या चालविल्या जातात. येथे काम करणाऱ्या कार्यकर्त्या ह्या पूर्णत: दाई नसतात किंवा बालशिक्षिकाही नसतात. तर त्या प्रामुख्याने साहाय्यिकेचे कार्य करत असतात. म्हणून बालविकासावर भर देणारा एक शिक्षणक्रम विद्यापीठाने विकसित केला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात ह्या कार्याला एकवाक्यता येईल आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने हा शिक्षणक्रम राबविता येईल.

### बालसंगोपन आणि रंजन शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

(१) बालविकास क्षेत्रातील पाश्चात्त्य व भारतीय शिक्षणतज्ज्ञांच्या योगदानाचा अल्प परिचय विद्यार्थ्यांना करून देणे व त्यांच्या कार्याचे बालविकासाच्या दृष्टीने महत्त्व विद्यार्थ्यांवर बिंबविणे.

(२) बालविकासाच्या सर्वांगीण प्रक्रियेची मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रशिक्षणार्थ्यांना तोंडओळख करून देणे.

(३) बालविकासाच्या संदर्भात अध्ययनप्रक्रियेचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

(४) बालकांचा आहार व आरोग्यासंदर्भात शास्त्रशुद्ध माहिती प्राप्त करून त्याचा बालविकासासाठी उपयोग करून घेण्यास मदत करणे.

(५) बालविकासाची तत्त्वे, बालविकास, मानसशास्त्र, आहार, आरोग्य ह्यांचे स्वरूप स्पष्ट करून त्या अनुषंगाने कार्यवाही व मूल्यमापनाची क्षमता प्रशिक्षणार्थ्यांत विकसित करणे.

(६) खेळवाडी व अंगणवाडी, बालवाडी, इत्यादींच्या आयोजनासाठी कार्यपद्धतीचे आवश्यक ते नियोजन व व्यवस्थापन ह्यांसंबधी मार्गदर्शन करणे.

(७) स्थानिक परिसर व उपलब्ध साधनसामग्रीसह परिणामकारक व कार्यक्षमतेने बालविकास केंद्र, खेळवाडी व तत्सम उपक्रम चालविण्याची क्षमता विकसित करणे.

(८) बालसंगोपन आणि रंजन शिक्षण कार्यकर्तीकडे आवश्यक असणाऱ्या वैशिष्ट्यांची जाणीव करून देणे.

## २.१ शिक्षणक्रमाची संरचना

(अ) अभ्यासक्रम – ४

(आ) कालावधी – ०६ महिने

(इ) एकूण श्रेयांक – १६ तात्त्विक – (४ श्रेयांक प्रत्येक अभ्यासक्रम)

(ई) एकूण अध्ययन तास : ४८० ते ५६० तास

(उ) **एकूण गुण ४०० गुण**

### ■ शिक्षणक्रमाचे स्वरूप

**तात्त्विक भाग : अभ्यासक्रम (एकूण ४)**

**EDU 131: बालविकासाची मूलतत्त्वे, बालविकास व बालमानसशास्त्र (Basic principles of child care education and psychology)**

घटक १ : बालविकास व बालमानसशास्त्र
घटक २ : बालशिक्षणाची मूलतत्त्वे आणि सिद्धांत
घटक ३ : सहजप्रवृत्ती, अध्ययन प्रक्रिया आणि बालकांचे शिक्षण
घटक ४ : बालकाचा शारीरिक व कारक विकास
घटक ५ : बालकाचा भाषिक विकास
घटक ६ : बालकाचा भावनिक व सामाजिक विकास
घटक ७ : बालकाचा सर्जनशील व सौंदर्यदृष्टीचा विकास
घटक ८ : बालकाचा बौद्धिक विकास

**EDU 132: बालशिक्षण : बाल आहार व आरोग्य (Diet, Nutrition and health of child)**

घटक १ : बालकाचे आरोग्य
घटक २ : बालकाचा आहार
घटक ३ : बालकाची शारीरिक वाढ व मानसिक आरोग्य
घटक ४ : बालकाच्या आरोग्य व आहाराशी संबंधित सवयी व वर्तने
घटक ५ : बालकाची, परिसराची व अन्नपाण्याची स्वच्छता
घटक ६ : बालकाचे नेहमीचे आजार
घटक ७ : अपघात आणि प्रथमोपचार
घटक ८ : बालकांची वैद्यकीय तपासणी व्यंगासंबंधी पालकसंपर्क

## EDU 133: बालशिक्षण कार्यपद्धती
### (Functioning of child Education)

घटक १ : बालशिक्षण कार्यपद्धतीचे मार्गदर्शक तत्त्वे

घटक २ : शारीरिक व कारक विकासासाठी कार्यपद्धती

घटक ३ : भाषिक विकासासाठी कार्यपद्धती

घटक ४ : सामाजिक, भावनिक आणि सहजप्रवृत्तीच्या विकासासाठी कार्यपद्धती

घटक ५ : जीवन व्यवहाराची कार्यपद्धती

घटक ६ : सर्जनशीलतेच्या विकासासाठी कार्यपद्धती

घटक ७ : कलानुभवाची कार्यपद्धती

घटक ८ : विज्ञान व परिसर अभ्यासासाठी कार्यपद्धती

## EDU 134: बालशिक्षणाचे व्यवस्थापन व मूल्यमापन
### (Organisation and evaluation of child education)

घटक १ : केंदाचे व्यवस्थापन व संघटन

घटक २ : भौतिक सुविधा व परिसर

घटक ३ : साहित्य निर्मिती, देखभाल व दुरुस्ती

घटक ४ : केंद्रातील विविध अभिलेख, फाईल व नोंदी

घटक ५ : मानवी संबंध

घटक ६ : व्यापक नियोजन

घटक ७ : अल्पकालीन शैक्षणिक नियोजन

घटक ८ : मूल्यमापन

## २.२ अध्ययन पद्धती

प्रस्तुत शिक्षणक्रमासाठी विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रामार्फत प्रशिक्षणार्थींना स्वयं-अध्ययन साहित्य पुरविण्यात येईल. या शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे तात्त्विक पाठयक्रमांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, प्रात्यक्षिके, इत्यादी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करावयाची आहेत. स्वाध्याय लेखनानंतर चर्चा, कृतिसत्रे, उद्‌बोधन, प्रबोधन, इत्यादींसाठी संपर्कसत्रे आयोजित केली जातील. त्याबाबत सविस्तर तपशील वेळोवेळी पत्राने अभ्यासकेंद्रांना कळविण्यात येईल व अभ्यासकेंद्रामार्फत अध्ययनार्थींना कळविले जाईल. याशिवाय महाराष्ट्रातून वेगवेगळ्या भागातून आलेल्यांचे अभ्यासगट करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

### संपर्कसत्राचे आयोजन व प्रशिक्षणार्थींची उपस्थिती

बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे त्याच्या सर्व प्रकारच्या कार्यासाठी योजनाबद्ध संपर्कसत्राची आवश्यकता आहे. ही संपर्कसत्रे विद्यापीठाने काळजीपूर्वक निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर आयोजित होतील. राज्यातील प्रतिथयश बालशिक्षण संस्थांची अभ्यासकेंद्र म्हणून निवड केलेली आहे. या विद्यापीठाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार संपर्कसत्रांचे आयोजन करण्यात येईल. संपर्कसत्रातील विषयतज्ज्ञांची उपस्थिती व सहभाग अत्यावश्यक समजला जाईल. त्याचप्रमाणे संपर्कसत्रात शिक्षणक्रमाचा तात्त्विक भाग, शिक्षणातील व्यवहार व प्रात्यक्षिके यांमधील परस्परसंबंध राखता यावा, तत्त्वांचा, व्यावहारिक उपयोजनांचा कार्यभाग सहजपणे शक्य व्हावा, व्यवहारातून तत्त्वांची संकल्पना दृढ व्हावी या पद्धतीने संपर्कसत्रांचे वेळापत्रक व आयोजन करण्यात येते.

## २.३ प्रवेश प्रक्रिया

### प्रवेश पात्रता

### (अ) शैक्षणिक अर्हता

(१) उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण किंवा

(२) मुक्त विद्यापीठाची पूर्वतयारी प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण किंवा

(३) स्वयं साहाय्य प्रेरक-प्रेरिका (S.H.G.) परीक्षा उत्तीर्ण किंवा

(४) इतर विद्यापीठात बी. ए./बी. कॉम./ बी. एस्सी. करणारे विद्यार्थी ह्या शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यास पात्र आहेत.

### (आ) अनुभवी व्यक्तीस पात्रता

बालशिक्षण/बालसंगोपन क्षेत्रात किमान एक वर्षाचा अनुभव असणाऱ्या व्यक्तीस प्रवेश पात्रता S.S.C. उत्तीर्ण.

### (इ) वय

(१) किमान १८ वर्षे पूर्ण असणारी व्यक्ती (महिला किंवा पुरुष)

### (ई) प्रवेश निवड

पात्र व्यक्ती प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश या तत्त्वानुसार एकूण ५० अध्ययनार्थीस प्रवेश देण्यात येईल. (अभ्यास केंद्र सुरू ठेवण्यासाठी किमान १० अध्ययनार्थीस प्रवेश आवश्यक आहे. त्यापेक्षा विद्यार्थी संख्या कमी असल्यास त्यांचे प्रवेश विद्यापीठाच्या नियमानुसार जवळच्या केंद्रावर देण्यात येईल.)

## २.४ शिक्षणक्रम शुल्क

| | | |
|---|---|---|
| १ | विद्यापीठ शुल्क | रु. १०००/- |
| २ | अभ्यासकेंद्र शुल्क | रु. ५७५/- |
| | एकूण शुल्क | रु. १५७५/- |

विद्यापीठ शुल्काची विभागणी

| | | |
|---|---|---|
| १. | परीक्षा शुल्क | रु. २५०/- |
| २. | शैक्षणिक शुल्क | रु. २५०/- |
| ३. | नोंदणी शुल्क | रु. १००/- |
| ४. | विकास निधी | रु. २५०/- |
| ५. | इतर | रु. १५०/- |
| | एकूण | रु. *१०००/- |

०१. अध्ययनार्थीने विद्यापीठ शुल्क ऑनलाईन प्रवेश अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन पद्धतीनेच भरावे.

०२. अभ्यासकेंद्र शुल्क आपण निवड केलेल्या अभ्यासकेंद्रावर भरावे.

०१. वरील शुल्काव्यतिरिक्त जादा शुल्क देऊ नये. जादा शुल्क दिल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## २.५ कालावधी

प्रस्तुत शिक्षणक्रम दूरस्थ अध्यापनपद्धतीद्वारे आयोजित केला जाणार असून नोंदणीपासून परीक्षेपर्यंतचा कालावधी ६ महिन्याचा राहील व अधिकतम कालावधी २ वर्षांपर्यत असेल. नापास/अनुपस्थित असणाऱ्यास प्रवेशापासून २ वर्षांच्या आत हा शिक्षणक्रम रु. १००/- प्रतिसंपर्कसत्र दिवस अतिरिक्त शुल्क भरून करता येईल.

### संपर्कसत्र कालावधी

एकूण ०७ दिवस रोज घड्याळी ६ तासाप्रमाणे एकूण ४२ तास उद्‌बोधनसत्र २ दिवस (शिक्षणक्रमाचे स्वरूप व साहित्य वाटप, इत्यादी) व मुख्य संपर्कसत्र ५ दिवस.

### संपर्कसत्राचा कार्यक्रम व उपस्थिती

या शिक्षणक्रमासाठी अभ्यासकेंद्रावर एकूण तीन संपर्कसत्रे घेण्यात येतील.

(१) उद्‌बोधन (०२ दिवस)
या संपर्कसत्रात मुक्त विद्यापीठ, विद्यापीठातील विविध शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्र इत्यादी संदर्भात माहिती आणि सर्व अभ्यास विषयांची ओळख करून देण्यात येईल. तसेच पुढील कार्यक्रमाचा परिचय करून देण्यात येईल.

(२) मुख्य संपर्कसत्र (०५ दिवस)
ह्या संपर्कसत्रात केंद्रावरील तज्ज्ञ समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली काही कार्ये पूर्ण करून घेतले जाईल आणि सर्व सैद्धांतिक विषयाचे समंत्रण होईल. संपर्कसत्रात पूर्वी केलेली अंतर्गत कार्य व त्यानंतर घरी केलेल्या कार्याचे मूल्यमापन होईल. यात अहवाल व स्वाध्याय सादरीकरण होईल. पुन्हा समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली काही व समंत्रण, परीक्षेची तयारी ह्याविषयी मार्गदर्शन करण्यात येईल.

### माध्यम

विद्यापीठाने संपूर्ण अध्ययन-साहित्य हे मराठी भाषेत तयार केलेले आहे. त्यामुळे संपूर्ण शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी भाषा राहील. संपर्कसत्रांचे माध्यम मराठी राहील. उत्तरे हिंदी/इंग्रजीतून लिहिण्यासाठी पूर्व परवानगीने देण्यात येईल. अशा प्रशिक्षणार्थींना अंतिम परीक्षेतदेखील हिंदी/इंग्रजीतून उत्तरे लिहिण्याची पूर्व परवानगीने एका माध्यमाचा वापर करता येईल.

## २.६ मूल्यमापन प्रक्रिया

(१) हा शिक्षणक्रमाचा एकूण ४०० गुणांचा आहे.

(२) या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन अंतर्गत मूल्यमापन २०% व अंतिम मूल्यमापन ८०% असे करण्यात येईल. अंतर्गत मूल्यमापनासाठी विद्यार्थ्याला स्वाध्याय / क्षेत्रीय कार्य / प्रात्यक्षिक कार्य करावे लागेल.
अंतिम परीक्षेपूर्वी विद्यार्थ्याने अंतर्गत कार्य पूर्ण करणे अत्यावश्यक असेल. अंतिम मूल्यमापन म्हणून ४ अभ्यासक्रमांची अंतिम परीक्षा घेण्यात येईव. त्यात ५-५ गुणांचे प्रश्न असतील.

### (अ) अंतर्गत मूल्यमापन

विद्यार्थ्याने स्वाध्याय आणि अभ्यासकेंद्र गृह आणि क्षेत्रीय ठिकाणी केलेल्या प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन केले जाणे अपेक्षित आहे.

### (आ) अंतिम मूल्यमापन

अंतिम मूल्यमापनात चार विषयांवर प्रत्येकी ८० गुणांची अंतिम 'लेखी परीक्षा' अंतर्भूत आहे.

### (इ) उत्तीर्णतेचे नियम

(१) विद्यार्थ्याने सर्व अंतर्गत कार्य पूर्ण करणे आवश्यक आहे.

(२) विद्यार्थ्याने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतर्गत कार्य आणि अंतिम परीक्षेचे मिळून किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(३) अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत आणि अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण करून अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

# बालसंगोपन आणि रंजन शिक्षण शिक्षणक्रम C31

## २०१८-१९ अभ्यासकेंद्र यादी

| अ.क्र. | विभागाचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव, पत्ता, दूरध्वनी व इमेल |
|---|---|---|---|---|---|
| **1** | अमरावती विभाग | 1 | अमरावती | **12123** | श्री. दादासाहेब तारे कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन, अचलपूर, सुलतानपूरा रोड, अचलपूर, जि. अमरावती<br>दूरध्वनी : 07223-250289, 9422159479<br>इ-मेल : Shripad.tare@gmail.com |
| | | 2 | वाशिम | **1514A** | यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ एज्युकेशन, मंगरूळपीर जि. वाशिम<br>दूरध्वनी : 9763009452 |
| | | 3 | यवतमाळ | **1473A** | त्यागी सेवा मंडळाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स, गांधी नगर, चर्चजवळ, यवतमाळ, जि. यवतमाळ.<br>दूरध्वनी : 9423134910<br>इ-मेल : mpthakur@gmail.com |
| | | 4 | यवतमाळ | **1410A** | गुणवंतराव देशमुख शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ.<br>दूरध्वनी :9604588135<br>इ-मेल : thakare.sharad@rediffmail.com |
| | | 5 | बुलढाणा | **1398A** | प्रतिमा क्रियोटीव्ह बहुउद्देशीय संस्था, द्वारा-डॉ. मालू, सिव्हील लाईन, खामगाव, जि. बुलढाणा-444303,<br>दूरध्वनी : 07263-253145 / 8149743111<br>इ-मेल : prakashmaloo@rediffmail.com |
| | | 6 | अमरावती | **12169** | प्रभात एज्युकेशन सोसायटी, खोलापूरी गेट, अमरावती जि. अमरावती - 444601<br>दूरध्वनी : 0721-2570261, 9822356953 |
| | | 7 | अकोला | 11100 | नानासाहेब चिंचोळकर विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला - 444502<br>दूरध्वनी : 8007684305 / 9423848325 |
| | | 8 | अकोला | 11119 | कर्मयोगी शिक्षण प्रसारक संस्था आपातापा, ता.जि. अकोला द्वारा संचलित कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर विद्यालय आपाताप, ता. जि. अकोला - 444 003<br>दूरध्वनी : 9850029594 |
| | | 9 | वाशिम | **1534A** | श्री. तुळशीराम जाधव कला महाविद्यालय, सोनखास रोड, लाखाळा, वाशिम, जि. वाशिम - 444505<br>दूरध्वनी : 07252 - 235055 / 9421300707<br>**इ-मेल :** Stjkm.washim@gmail.com |
| **2** | **औरंगाबाद विभाग** | 1 | औरंगाबाद | 21168 | सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, द्वारा-डॉ. हेडगेवार रुग्नालय, जवाहर कॉलनी, गारखेडा, औरंगाबाद - 431005,<br>दूरध्वनी : 9422708333 / 9422701847 |
| | | 2 | जालना | **2321A** | वसंतराव नाईक अध्यापक कॉलेज ऑफ एज्युकेशन छत्रपती कॉलनी, जालना, ता. जालना, जि. जालना<br>दूरध्वनी : . 9422219821 |

| अ.क्र. | विभागाचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव, पत्ता, दूरध्वनी व इमेल |
|---|---|---|---|---|---|
| **3** | **मुंबई विभाग** | 1 | मुंब्रा | **35324** | सर शमीम उस्मानिया एज्युकेशनल अँड वेलफेअर ट्रस्टद्वारा रोझरी कॉन्व्हेंट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, मुंब्रा, जि. ठाणे पिन - 400 612<br>दूरध्वनी : 022-25460737/25463090/9421433188<br>इ-मेल : rosarychs@rediffmail.com |
| **4** | **नागपूर विभाग** | 1 | भंडारा | **4128 A** | मानव धरम शिक्षा, क्रीडा प्रसारण व समस्या निवारण ट्रस्ट, गणेशपूर, भंडारा, ता. भंडारा, जि. भंडारा.<br>दूरध्वनी : 8888490184 |
| | | 2 | चंद्रपूर | **4281 A** | धोटे एज्युकेशन सोसायटी कल्पना कॉन्व्हेंट प्रि-प्रायमरी स्कूल नेरी, उर्जानगर, ता. चंद्रपूर.<br>दूरध्वनी : 07172 - 260475, 9890667223 |
| | | 3 | आरमोरी | **4302 A** | ॲड. एन. एस. गंगुवार कॉलेज ऑफ एज्युकेशन, बस स्टँड रोड, आरमोरी, जि. गडचिरोली<br>दूरध्वनी : 07132-232453/9423422017<br>9422941127 |
| | | 4 | आरमोरी | **4321 A** | किशनराव खोबरागडे शिक्षण महाविद्यालय, बस स्टँड रोड, आरमोरी, जि. गडचिरोली.<br>दूरध्वनी : 07132-266784/9422144150 |
| | | 5 | गडचिरोली | **4322 A** | श्री. किशनराव खोबरागडे शिक्षण महाविद्यालय, मूलरोड गडचिरोली, जि. गडचिरोली.<br>संपर्क : 07132-233211/फॅक्स : 07132 233211 |
| | | 6 | नागपूर | **44250** | पालीवाल बी.एड. कॉलेज पारशीवनी, नागपूर, जि. नागपूर.<br>दूरध्वनी : 0712-2744965/9422344640<br>इ-मेल : arvinddunedar05@gmail.com |
| | | 7 | भंडारा | **4144A** | स्व. मायादेवी राजभोज मूकबधीर कार्यशाळा, द्वारा द लॉर्ड पब्लिक स्कूल, जलाराम चौक, स्टेट बँकेसमोर, भंडारा.<br>दूरध्वनी : 7038084550 |
| | | 8 | सावरगाव | **4714 A** | यशवंतराव पाटील राऊत अध्यापक कॉलेज, मु.पोस्ट, सावरगाव, ता. नारखेड, जि. नागपूर.<br>दूरध्वनी : 9823350544/9923859070 |
| | | 9 | नागपूर | 44349 | पुणे सेवा सदन सोसायटी, झाशी राणी चौक, सीताबर्डी नागपूर - 440010<br>दूरध्वनी : 0712-2053609/ 9860438410 |
| **5** | **नाशिक विभाग** | 1 | करोडी | 51152 | जवाहर ज्युनियर कॉलेज, मु. पोस्ट, करोडी चिंचापुरी (ईरादे) ता. पाथर्डी, जि. अहमदनगर<br>दूरध्वनी : 9371730913<br>इ-मेल : mmbangar.mb@gmail.com |
| | | 2 | शेंदुर्णी, जामनेर | 53132 | शेंदुर्णी शिक्षणसंस्था, शेंदुर्णी ता. जामनेर, जि. जळगाव<br>दूरध्वनी : 02580-252246/9228725529 |

| अ.क्र. | विभागाचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव, पत्ता, दूरध्वनी व इमेल |
|---|---|---|---|---|---|
| | | 3 | जळगाव | 53139 | खांदेश एज्युकेशन सोसायटीचे डी.एड. कॉलेज<br>एम. जे. कॉलेज कॅम्प्स, जळगाव, जि. जळगाव.<br>दूरध्वनी : 0257-2227959 / 8600602530<br>इ-मेल : srpchopde@gmail.com |
| | | 4 | अमळनेर | **53155**A | नवीन मराठी शाळा, लोकमान्य शिक्षण मंडळ, अंमळनेर<br>जि. जळगाव<br>दूरध्वनी : 02587-233942/9423930649 |
| | | 5 | नाशिक | 54268 | शिशुविहार बालक मंदिर, राम भूमी, डॉ. मुंजे रोड<br>नाशिक, जि. नाशिक<br>दूरध्वनी : 0253-2309616/9881492988 |
| | | 6 | नाशिक | 54413 | पी.व्ही.जी. कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, दिंडोरी रोड<br>म्हसरूळ, नाशिक, जि. नाशिक - 422 004<br>दूरध्वनी : 0253-2530118 / 9511254051 |
| **6** | **पुणे विभाग** | 1 | महालुंगे, पुणे | 62351 | महालुंगे ट्रस्ट डी.एड. कॉलेज<br>मु.पो. महालुंगे, ता. खेड, जि. पुणे<br>दूरध्वनी : (02335) 259213/9890524242<br>इ-मेल : mahalungedtedyahoo.com |
| | | 2 | शंकरनगर, पुणे | 63105 | प्रज्ञा बालवाडी ट्रेनिंग संस्था<br>10, वृंदावन सोसायटी, शंकर नगर<br>पुणे - 411009.<br>दूरध्वनी : मो. 9860459728 |
| | | 3 | पुणे | 62500 | समर्थ ज्ञानपीठ, सोमेश्वर नगर संचलित, सह्याद्री कॉलेज ऑफ एज्युकेशन, वाघलवाडी, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे<br>पिन - 412306<br>दूरध्वनी : 02112-222489 / 8888567044<br>इ-मेल : samarthshikshan@yahoo.com |
| **7** | **कोल्हापूर विभाग** | 1 | बाहुबली | 71195 | एम.जी. शहा विद्यालय व ज्यु. कॉलेज<br>बाहुबली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर<br>दूरध्वनी : (0230) 2584452<br>इ-मेल : jaygomtesh@gmail.com |
| | | 2 | कोल्हापूर | 71131 | स्व. मारूतीराव विष्णु वारके शिक्षण प्रसारक मंडळ,<br>तुरंबे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर - 416208<br>दूरध्वनी : 9960258585 |
| | | 3 | सिंधुदुर्ग | 7457A | हरीशचंद्र काजरेकर संस्था, 2121, काजरेकर कॉम्पलेक्स<br>विठ्ठलवाडी कुडाळ, जि. सिंधुदुर्ग<br>दूरध्वनी : 02362-23061/9422963521 |
| | | 4 | कोल्हापूर | 71194 | तात्यासाहेब मुसळे स्कूल, सांगली रोड<br>इचलकरंजी, जि. कोल्हापूर<br>दूरध्वनी : 9763177634 / 9922680363<br>इ-मेल : vaishalikade2002@gmail.com |
| **8** | नांदेड विभाग | 1 | लोणी<br>उद्गीर | 84102 | कौशल्याबाई सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, पर्यावरण सेवाभावी संस्था, मु.पो. लोणी, ता. उदगीर, जि. लातूर.<br>दूरध्वनी : 9890752666/9158538553 |

| अ.क्र. | विभागाचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव, पत्ता, दूरध्वनी व इमेल |
|---|---|---|---|---|---|
| | | 2 | किनगाव<br>अहमदपूर | 8464 A | महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव<br>ता. अहमदपूर, जि. लातूर.<br>दूरध्वनी : 9421380048/9763616663 |
| | | 3 | शिवाजीनगर<br>नांदेड | 85127 | वनिता विकास मंडळ द्वारा भानुमती वर्मा बालक मंदिर<br>शिवाजीनगर, जि. नांदेड<br>दूरध्वनी : 02462-2328111/9852522030<br>इ-मेल : vanitavikasmandalc31@gmail.com |
| | | 4 | अर्धापूर | 8577A | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन<br>ता. अर्धापूर, जि. नांदेड.<br>दूरध्वनी : 9825681992 |
| | | 5 | लोहगाव | 8763A | नृसिंह डी.टी.एड. कॉलेज, मु.पो. लोहगाव, जि. परभणी.<br>दूरध्वनी : 8007294216/8007294215<br>इ-मेल : pvdache@gmail.com<br>principalnded@gmail.com |
| | | 6 | शिवाजीनगर<br>हिंगोली | 8822A | जिवक अकादमी, रेनबो प्रतिष्ठान, शिवाजीनगर, हिंगोली<br>संपर्क : 02456-221040, 9822882842 |
| | | 7 | वसमत | 8824 A | संजीवनी बहुउद्देशीय सेवाभावी सोसायटी द्वारा<br>लिटील किंग्ज इंग्लिश स्कूल, मु.पो. ता. वसमत, जि. हिंगोली<br>दूरध्वनी : 9850626095/8308258983 |

**शिक्षणक्रम संयोजक :** डॉ. डी. डी. पवार, सहाय्यक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# ३. स्वयं-साहाय्य गट प्रेरक/प्रेरिका (C32) : शिक्षणक्रमाविषयी

स्वयं-साहाय्य गट (सेल्फ हेल्प ग्रुप/(SHG) 'बोली भाषेत महिलांचे बचतगट' ह्याचे महत्त्व हे गेल्या दशकात अनुभवांनी सिद्ध झालेले आहे. 'आर्थिक स्वावलंबनातून क्षमतावाढीचे प्रयत्न, त्यानंतर चौफेर विकासाची संघटित धडपड' हे सूत्र घेऊन बचतगटाचे प्रयोग चळवळीत रूपांतर झाले. पण त्यासंदर्भात प्रत्यक्ष मान्यताप्राप्त शिक्षणक्रम मात्र अद्यापही अस्तित्वात नव्हता आणि या स्वयं-साहाय्य गटाचे गुणात्मक विकसन करायचे तर अशा शिक्षणक्रमाची आवश्यकता आहे.

त्या दृष्टीने आज वैयक्तिक व संस्था पातळीवर सर्वत्र झपाट्याने प्रयत्न होत आहेत. त्या प्रयत्नांचाच भाग म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने 'स्वयं-साहाय्य गट प्रेरक/प्रेरिका शिक्षणक्रम' विकसनाचे कार्य हाती घेतले. ह्यासाठी चैतन्य (राजगुरुनगर, जि.पुणे) व बायफ (पुणे) ह्या अनुभवसिद्ध संस्थांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

या शिक्षणक्रमाचा कालावधी सहा महिन्यांचा आहे. जे विद्यार्थी नियोजित सहा महिन्यांत हा शिक्षणक्रम पूर्ण करू शकणार नाहीत त्यांना प्रवेशापासून दोन वर्षांत केव्हाही हा शिक्षणक्रम पूर्ण करता येईल. मात्र त्या दोन वर्षांतही जे विद्यार्थी हा शिक्षणक्रम पूर्ण करू शकणार नाहीत त्यांना त्या वर्षाचे या शिक्षणक्रमाचे शुल्क भरून पुन्हा दोन वर्षे पुनर्नोंदणी करता येईल.

## उद्दिष्टे

- महिला सबलीकरण व दारिद्र्य निर्मूलनाच्या दृष्टीने महिलांच्या स्थितीचे, स्त्री-पुरुष असमानतेचे विश्लेषण करून सुसंगत विचार व प्रवृत्ती यांची जाण वाढविणे.
- महिला स्वयं-साहाय्य गटाची गरज, संकल्पना कार्यपद्धती स्पष्ट करणे.
- स्वयं-साहाय्य गटाची बांधणी, स्थैर्य, विस्तार ह्यासाठी आवश्यक त्या क्षमता, कौशल्ये अपेक्षित प्रमाणात विकसित करणे.
- स्वयं-साहाय्य गट आणि सबलीकरणासाठी प्रेरक/प्रेरिका ह्या भूमिका पार पाडण्यास व आवश्यक ती कार्ये करण्याच्या दृष्टीने सक्षम करणे.

## ३.१ शिक्षणक्रमाची संरचना

(अ) अभ्यास विषय : ४
(आ) किमान कालावधी : ६ महिने
(इ) एकूण श्रेयांक : १६
(ई) एकूण अध्ययन तास : ४८० ते ५६० तास

शिक्षणक्रमाचे स्वरूप

प्रस्तुत शिक्षणक्रमाचे दोन मुख्य भाग आहेत -

(अ) तात्त्विक भाग (आ) प्रात्यक्षिक भाग

*(अ) तात्त्विक भाग : पाठ्यक्रम*

विषय १ : महिलांचे सबलीकरण, दारिद्र्य निर्मूलन व स्वयं-साहाय्य गट (EDU 121) Woman's Empowerment and Self Help Group

घटक १ : महिलांची सद्यस्थिती : प्रगती व मर्यादा
घटक २ : महिलांचे कुटुंबातील स्थान
घटक ३ : महिलांचे सबलीकरण
घटक ४ : दारिद्र्य निर्मूलन व स्वयं-साहाय्य गट
घटक ५ : स्वयं-साहाय्य गट संकल्पना व स्वरूप
घटक ६ : स्वयं-साहाय्य गटाचे फायदे व परिणाम
घटक ७ : बचत गट व बचत बँका

विषय २ : गटपूर्वतयारी व गटनिर्मिती (EDU 122) Preparation and formation of group

घटक १ : स्वयं-साहाय्य गटाची कार्यपद्धती
घटक २ : गरजूंचा शोध व गरजूंसोबत संवाद
घटक ३ : सभासद निश्चिती व शिक्षण
घटक ४ : नेतृत्व निवड व प्रशिक्षण
घटक ५ : बैठकींची माहिती व प्रत्यक्ष बैठका
घटक ६ : गटनिर्मिती व संचालन
घटक ७ : गटाच्या प्राथमिक नोंदी व बँक खाते उघडणे

विषय ३ : गटविकासासाठीची साधने व विस्तार (EDU 123) Stabilisation and Expansion of group

घटक १ : गटविकासासाठीची साधने व समन्वय
घटक २ : गटातील अडचणी व उपाय
घटक ३ : स्वयं-साहाय्य गटाचे सहभागीय देखरेख व मूल्यांकन
घटक ४ : स्वयं-साहाय्य गट स्थापनेसाठी संपर्क
घटक ५ : स्वयं-साहाय्य गट विस्तारासाठी संपर्क
घटक ६ : उद्योजकता विकासाचे टप्पे
घटक ७ : प्रेरिकेचा स्वयं-साहाय्य गटाला निरोप

विषय ४ : स्वयं-साहाय्य गटाकरिता कौशल्ये व क्षमता (EDU 124) Skill and competency required for Self Help Group

घटक १ : सूक्ष्म नियोजन कौशल्ये
घटक २ : स्वयं-साहाय्य गटासंदर्भात सुसंवादाची मूलभूत कौशल्ये व तंत्रे
घटक ३ : स्वयं-साहाय्य गटाच्या विविध टप्प्यांसाठी सुसंवादाची कौशल्ये
घटक ४ : समूह प्रक्रियेशी संबंधित कौशल्ये व क्षमता

## ३.२ अध्ययन पद्धती

पारंपरिक विद्यापीठांपेक्षा मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रमाची अध्ययन–पद्धती वेगळी आहे. ही पद्धती दूरशिक्षण संकल्पनेवर आधारित आहे. स्वयं–अध्ययन करण्यासाठी उपयोगी पडतील अशी स्वयं–अध्ययन पाठ्यपुस्तके आपणाला विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रा–मार्फत पुरविण्यात येतील. या शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं–अध्ययनाची असली तरी तात्त्विक विषयांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, प्रात्यक्षिके, इत्यादी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करावयाची आहेत. स्वाध्याय लेखनानंतर चर्चा, कृतिसत्रे, उद्‌बोधन, प्रबोधन, इत्यादींसाठी संपर्कसत्रे आयोजित केली जातील. त्याबाबत सविस्तर तपशील वेळोवेळी पत्राने अभ्यासकेंद्रात व प्रशिक्षणार्थींना कळविण्यात येईल.

### संपर्कसत्रांचा कार्यक्रम व उपस्थिती

या शिक्षणक्रमासाठी तुमच्या अभ्यासकेंद्रावर एकूण चार संपर्कसत्रे घेण्यात येतील.

**(१) उद्‌बोधन/परिचयपर सत्र (२ दिवस)**

या संपर्कसत्रात मुक्त विद्यापीठ, विद्यापीठातील विविध शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्र इत्यादींसंदर्भात माहिती आणि सर्व अभ्यास विषयांची ओळख करून देण्यात येईल. तसेच पुढील संपूर्ण कार्यक्रमाचा परिचय करून देण्यात येईल.

**(२) प्रथम संपर्कसत्र (४ दिवस)**

ह्या संपर्कसत्रात केंद्रावर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली काही अंतर्गत कार्य पूर्ण करून घेतले जाईल आणि सर्व सैद्धांतिक विषयांचे संमंत्रण होईल. तसेच पहिल्या संपर्कसत्रानंतर घरी व परिसरात करावयाच्या कामाबद्दलची माहिती देण्यात येईल.

**(३) द्वितीय संपर्कसत्र (५ दिवस)**

दुसऱ्या संपर्कसत्रात पूर्वी केलेली अंतर्गत कार्य व त्यानंतर घरी केलेल्या कार्याचे मूल्यमापन होईल. पुन्हा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली संमंत्रण व शंका–समाधान केले जाईल.

**(४) तृतीय संपर्कसत्र (३ दिवस)**

यात संमंत्रण आणि अंतिम परीक्षेच्या दृष्टीने तयारी करून घेण्यात येईल.

टीप : (१) सर्व संपर्कसत्रांसाठी उमेदवारांना येण्याजाण्याची, राहण्याची, जेवणाची व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल. अभ्यासकेंद्र ही सोय उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ते सहकार्य करील. सर्व संपर्कसत्रांना उपस्थिती अनिवार्य असेल.

(२) केंद्रावर प्रवेश अत्यंत कमी झाल्यास इतर केंद्रावर प्रवेश वर्ग करण्यात येईल.

## ३.३ प्रवेश प्रक्रिया

### प्रवेश–पात्रता

हा शिक्षणक्रम खालील पात्रता असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस पूर्ण करता येईल.

(१) किमान सातवी पास व समाजकार्याची आवड असणारी १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वय असणारी व्यक्ती.

किंवा

(२) दहावी उत्तीर्ण व १८ वर्षे पूर्ण असणारी कोणतीही व्यक्ती.

(३) स्वयं–साहाय्य गटात काम करणाऱ्या व्यक्तींना प्राधान्य देण्यात येईल.

### एकूण जागा

प्रत्येक अभ्यासकेंद्रावर जास्तीत जास्त ५0अध्ययनार्थींना प्रवेश देण्यात येईल. आवश्यकतेनुसार तुकड्यांची संख्या वाढविण्यात येईल. कमीत कमी ५ अध्ययनार्थी असल्यास अभ्यासकेंद्र सुरू राहील. मात्र परीक्षा केंद्र एकत्रित असेल.

## ३.४ शिक्षणक्रम शुल्क

| | |
|---|---|
| विद्यापीठ शुल्क (ऑनलाईन) | रु. १000/– |
| अभ्यासकेंद्र शुल्क (अभ्यासकेंद्रावर) | रु . ५00/– |
| एकूण शुल्क | रु. १५००/– |

### विद्यापीठ शुल्काची विभागणी

| | |
|---|---|
| प्रवेश / नोंदणी शुल्क | रु. १00/– |
| शैक्षणिक शुल्क | रु. २५0/– |
| परीक्षा शुल्क | रु. २५0/– |
| विकास निधी | रु. २५0/– |
| इतर शुल्क | रु. १५0/– |
| एकूण | रु. १०००/– |

0१. अध्ययनार्थीने विद्यापीठ शुल्क ऑनलाईन प्रवेश अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन पद्धतीनेच भरावे.

0२. अभ्यासकेंद्र शुल्क आपण निवड केलेल्या अभ्यासकेंद्रावर भरावे.

0१. वरील शुल्काव्यतिरिक्त जादा शुल्क देऊ नये. जादा शुल्क दिल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## ३.५ कालावधी

(१) या शिक्षणक्रमाचा कालावधी किमान सहा महिने व कमाल दोन वर्षांचा असेल.

(२) ज्यांना हा शिक्षणक्रम कमाल कालावधीत (दोन वर्षांत) पूर्ण करता आला नाही त्यांना पुनर्नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल. त्यासाठी त्यावर्षी असणारे या शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क भरून पुनर्नोंदणी त्या पुढील दोन वर्षांकरिता करता येईल. ही पुनर्नोंदणी फक्त एकदाच करता येईल. (पुनर्नोंदणी कालावधी प्रथम नोंदणी कालावधीची मुदत संपल्याच्या दिनांकापासून मोजण्यात येईल.)

## माध्यम

या शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असेल. त्यामुळे पुरविण्यात येणारे सर्व अभ्यास–साहित्य मराठी माध्यमातून पुरविण्यात येईल. मात्र ज्या विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्यासाठी हिंदी वा इंग्रजी माध्यमाचा वापर करावयाचा असेल त्यांना तशी परवानगी देण्यात येईल.

## ३.६ मूल्यमापन प्रक्रिया

(१) या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन अंतर्गत मूल्यमापन २०% बहिस्थ मूल्यमापन ८०% असे करण्यात येईल.

(२) अंतर्गत मूल्यमापनासाठी विद्यार्थ्याला स्वाध्याय / क्षेत्रीय कार्य / प्रात्यक्षिक कार्य करावे लागेल.

(३) अंतिम परीक्षेच्या पूर्वी विद्यार्थ्याने अंतर्गत कार्य पूर्ण करणे अत्यावश्यक असते. बहिस्थ मूल्यमापन म्हणून ४ अभ्यासक्रमांची अंतिम परीक्षा घेण्यात येईल. त्यात ५–५ गुणांचे प्रश्न असतील.

## उत्तीर्णतेचे नियम

(१) विद्यार्थ्याने सर्व अंतर्गत कार्य पूर्ण करणे आवश्यक आहे.

(२) विद्यार्थ्याने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतर्गत कार्य आणि अंतिम परीक्षेचे मिळून किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(३) अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत आणि अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण करून अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

## ३.७ अभ्यासकेंद्र

| अ.क्र. | विभागीय केंद्र | जिल्हा केंद्र | अभ्यासकेंद्र नाव व पत्ता | केंद्र संकेतांक |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | अकोला | वनराई, ए.७०, स्लेक्टर कॉलनी, अकोला-४४४ 00१<br>फोन. ९४२३४९८५८९ | ११५८A |
| २ | औरंगाबाद | औरंगाबाद | महिला स्वयं-साहाय्य गटाची सहकारी पतसंस्था,<br>३१ शिवज्योती कॉलनी, जे.एन.ई.सी.रोड, एन. ६ सिडको<br>औरंगाबाद -४३१००३ ८४२१९८७०२५ | २११०३ |
| ३ | औरंगाबाद | औरंगाबाद | कुलस्वामिनी सेवाभावी संस्था,<br>५२१, एन-३, सिडको, कम्युनिटी सेंटर जवळ<br>औरंगाबाद-४३१००३ | २११३६ |
| ४ | औरंगाबाद | औरंगाबाद | श्री छत्रपती बहुउद्देशीय संस्था /आर./एक्स-०६/१५/२०<br>जयभगवान हौसिंग सोसायटी, अयोध्या नगर, वाळूज<br>जि. औरंगाबाद ९८२२६३९९७० | २११५२ |
| ५ | औरंगाबाद | जालना | कृषि विज्ञान केंद्र, पोस्ट बॉक्स नं. ४५, खापुडी<br>जि. जालना ७३५००१३१५९ | २३३२A |
| ६ | औरंगाबाद | जालना | अभिनव कॉलेज, छत्रपती कॉलनी, जालना<br>फोन : ०२५८२ - २२०५८२ | २३५१A |
| ७ | मुंबई | ठाणे | आदिवासी प्रगती मंडळ, कॉ. गोदावरी परुळेकर महाविद्यालय<br>तलासरी, जि.ठाणे- ४०१ ६०६ मोबा. ९४२२०१७६५५ | ३५२०८ |
| ८ | नागपूर | वर्धा | रिद्धी एस.एच.जी.केंद्र महेंद्रकुमार सुखदिया भवन<br>प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ, कारंजा (गाडगे)<br>जि.वर्धा ४२२२०३, फोन. ९४२२१४९८८१ | ४५४७A |
| ९ | नाशिक | अहमदनगर | आधार ग्रामीण समता विकास आणि संशोधन संस्था<br>सी-१, साई रेसिडेन्सी हॉटेल, उदय पॅलेस जवळ, नेवासा मार्ग<br>श्रीरामपूर, जि.अहमदनगर | ५१११७ |
| १० | नाशिक | अहमदनगर | मनोहर बाबा विद्यालय, सायखिंडी, पो.संगमनेर,<br>जि.अहमदनगर -४२२६०५. फोन -९८९०९६०७८४ | ५१११५८ |
| ११ | पुणे | पुणे | चैतन्य ग्रामीण विकास संस्था<br>राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे<br>फोन-०२१३५-२२३१७,२३२३२२६५९३ | ६३१०० |
| १२ | पुणे | पुणे | लिलावती महिला विकास मंडळ<br>सर्वे नं.१४/२,पुणे सोलापूर मार्ग,आकाशमार्ग, टेकवडे पेट्रोलपंपामागे<br>हडपसर, पुणे. फोन-९३७२१३४९९३ | ६२२८८ |
| १३ | नांदेड | नांदेड | डॉ. आंबेडकर मिशन य.च.म.मु.वि. अभ्यासकेंद्र<br>अर्धापूर, जि. नांदेड ९८२३६८१९९२ | ८५७७A |
| १४ | नांदेड | परभणी | अण्णा भाऊ प्राथमिक शाळा<br>रत्ननगर, गंगाखेड, परभणी -४३१५१४,<br>फोन-९८६७९९८४४६ | ८७६७A |

| अ.क्र. | विभागीय केंद्र | जिल्हा केंद्र | अभ्यासकेंद्र नाव व पत्ता | केंद्र संकेतांक |
|---|---|---|---|---|
| १५ | नांदेड | हिंगोली | संजीवनी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था<br>द्वारा-लिटल किंग्ज इंग्लिश स्कूल,<br>वसमत, जि. हिंगोली-४३१५१२ ९८५०६२६०९५ | ८८२४A |
| १६ | नांदेड | हिंगोली | रेनबो प्रतिष्ठान, शिवाजीनगर<br>हिंगोली-४३१ ५१३,<br>फोन-९०२८०६७०४८ | ८८१५A |
| १७ | अमरावती | यवतमाळ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन<br>गांधीनगर, यवतमाळ. फोन-०७२३२-२४११८९,<br>९४२३१३४९१० | १४७३अ |
| १८ | नाशिक | जळगाव | दिशा फाऊंडेशन, पाटील वाडी, एस.बी.आय. मागे<br>वाकी रोड, जामनेर, जि. जळगांव ९८९०६४०१३१ | ५३१४० |
| १९ | अमरावती | बुलढाणा | शिवपार्वती ग्राम विकास, सामाजिक बहुउद्देशिय संस्था<br>पिंप्री गवळी, ता. मोताळा, जि. बुलढाणा | १३१२३ |
| २० | कोल्हापूर | कोल्हापूर | मैथिली एस.एच.जी. केंद्र, २७५३ डी वार्ड<br>शुक्रवार पेठ, कोल्हापूर ९८२२१७१०५४ | ७११७५ |
